# महिला उमेदवारांना ओळखपत्राबाबत विशेष सूचना

जिल्हा परिषदेने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.0१/०२३ ला अनुसरुन आपण ऑनलाईन पद्धतीने सादर केलेल्या अर्जाच्या अनुशंगाने सदर पदाकरीता घेण्यात येणा-या ऑनलाईन परीक्षेस या प्रवेशपत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून नमूद केलेल्या दिवशी, वेळी आणि परिक्षा केंद्रावर उपस्थित राहण्यास सशर्त परवानगी देण्यात येत आहे. परीक्षेस येताना आपल्या सोबत अद्ययावत फोटो चिटकवलेले प्रवेशपत्र आणि सध्या वैध अशा ओळखीच्या पुराव्याची मूळ प्रत व त्याची एक छायांकीत प्रत (जसे की, स्वतःचे आधार काडी,ई-आधार कार्ड,पॅन कार्ड ,पारपत्र,वाहन चालक परवाना/निवडणूक आयोगाचे ओळखपत्रा बार काउंसिल ओळखपत्र/मान्यताप्राप्त महाविद्यालयाने दिलेले चालू वर्षासाठीचे ओळखपत्र) आणावे - हे आवश्यक आहे.

कृपया लक्षात घ्या - रेशनकार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारला जाणार नाही. मूळ ओळखपत्राच्या पुराव्याऐवजी केवळ त्याच्या छायांकीत प्रती अथवा कलर झेरॉक्स सादर केल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही व उमेदवारास परिक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल. उमेदवाराने परिक्षेच्यावेळी प्रवेश प्रमाणपत्र व उपरोक्त नमूद केलेल्या ओळखपत्रापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र व ओळखपत्राची छायांकीत प्रत सादर करावी. अन्यथा त्याचा परिक्षेस प्रवेश नाकारण्यात येईल याची उमेदवारांनी जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.

**कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सद्द स्थितीत वैध असे मूळ स्वरूपातील ओळखपत्र आणावे. प्रवेशपत्रावर असणारे नाव (ऑनलाईन नोंदणीच्यावेळी जे उमेदवाराने दिलेले असेल) ओळखपत्रावरील नमूद असलेल्या नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी हयाची खास दखल घ्यावी. जर प्रवेश पत्रावरील फोटो/नाव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक/विसंगती असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी मूळ राजपत्रित अधिसूचना / मूळ विवाह प्रमाणपत्र/ प्रस्तुत केले तरच त्यांना परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.**